विषय- ग्रामलेखा समन्वयक व पाणी गुणवत्ता
सल्लागार यांचे दैनंदीनीबाबत..

जलस्वराज्य् टप्पा-2 पाणी व स्वच्छता विभाग,
जिल्हा परिषद, सातारा
जा.क्र.जिपसा/ज-2/आस्था/ 172 /2019
पाणी व स्वच्छता विभाग, जि प सातारा
दिनांक - 11/9/2019

परिपत्रक

महाराष्ट्र शासन, पाणी पूरवठा व स्वच्छता विभागाकडील शासन निर्णय क्र.जस्वप्र-0214/प्रक्र.34/पापू-11 दि.17 फेब्रुवारी, 2014 नुसार जलस्वराज्य्- 2, पाणी व स्वच्छता विभागातंर्गत ग्रामलेखा समन्वयक व पाणी गुणवत्ता सल्लागार यांच्या कंत्राटी पध्दतीने तालुकास्तरावर ग्रामीण पाणी पूरवठा उपविभागांमध्ये नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.

सदर कंत्राटी कर्मचारी यांना त्यांचे दैनिक कामकाजाबाबत मासिक दैनंदीनी सादर करणे अनिवार्य आहे. दैनंदीनी सादर करताना संबंधितांनी केलेल्या दैनिक कामकाजाची उदा. दिवसभरात किती टपालांचा निपटारा केला, कोणते विशिष्ट काम केले, नेमून दिलेल्या कामकाजाप्रमाणे क्षेत्र भेटी केल्या आहेत किंवा कसे? इत्यादी बाबींचे कार्यविवरणपत्र ठेवण्यात यावे. दैनंदिनी सादर करताना तारिखनिहाय केलेल्या कामांच्या तपशीलाचा स्पष्ट उल्लेख करुन मासिक दैनंदिनी कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. सदरच्या दैनंदीनीमधील तपशीलाप्रमाणे कामकाजाची कार्यविवरणपत्रावरुन खातरजमा केल्यानंतरच दैनंदिनी मंजूर करण्यात याव्यात.

(संजय भागवत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सातारा

प्रति,

1. गट विकास अधिकारी, पंचायत समिती ....................(सर्व)
2. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा जि.प. उप विभाग ---------- (सर्व)

Scanned by CamScanner